# मुंबई विद्यापीठ

क्र.शिनिमावि(विशी)/आयसीडी/२०२०-२१/४८

## परिपत्रकः

विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग/संस्था यांचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तूशास्त्र महाविद्यालय, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, प्रभारी संचालक, ठाणे/रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड ॲप्लाईड सायन्सेस, कल्याण, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे आणि विश्वभूषण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, आंबडवे यांचे लक्ष या विभागाने क्र. शिनिमावि(विशी)/आयसीडी/२०२०-२१/१६३५ दिनांक १७ मार्च, २०२० रोजी निर्गमित केलेले परिपत्रका कडे वेधण्यात येत आहे. सदर परिपत्रकान्वये माननिय कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार कळविण्यात आले होते की, विद्यापीठात कार्यरत असलेल्या सर्व स्थायी शिक्षकांचे शैक्षणिक वर्ष १ जुलै २०१७ ते ३० जुन २०१८ आणि १ जुलै २०१८ ते ३० जुन २०१९ या कालावधीतील Self Appraisal Report दिनांक १३ एप्रिल २०२० पुर्वी तसेच १ जुलै २०१९ ते ३० जुन २०२० या कालावधीतील Self Appraisal Report १० जुलै २०२० पर्यंत सर्व संबंधीत कागदपत्रांसहित विभाग प्रमुख/संचालक यांनी वर्ष निहाय, गोपनिय पध्दतीने, सिलबंद लिफाफ्यात शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग, फोर्ट परिसर, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे सादर करण्याबाबात निर्देशित करण्यात आले होते.

परंतु, तद्नंतर कोवीड-१९ या महामारीच्या प्रार्दुभाव रोखण्यासाठी जारी केलेल्या टाळेबंदी (लॉकडॉउन) ची सद्यपरिस्थिती लक्षात घेता माननिय कुलगुरूंच्या आदेशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ज्या स्थायी शिक्षकांचे उपरोक्त नमूद कालावधिकरितांचे Self Appraisal Report सादर केलेले नाहीत त्या शिक्षकांचे अहवाल उपरोक्त नमूद पध्दतीनुसार १५ सप्टेंबर, २०२० पर्यंत सादर करावे, यांची नोंद घ्यावी.

मुंबई ४०००३२
६ ऑगष्ट, २०२०

( डॉ. विनोद पाटील )
प्रभारी कुलसचिव

प्रति,

विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभाग/संस्था यांचे विभाग प्रमुख/संचालक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तूशास्त्र महाविद्यालय, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, प्रभारी संचालक, ठाणे/रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड ॲप्लाईड सायन्सेस, कल्याण, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे आणि विश्वभूषण भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, आंबडवे

*****

प्रत माहितीकरिता रवाना

1. सर्व शाखांचे अधिष्ठाता
2. कुलगुरूंचे स्वीय सहायक
3. प्र कुलगुरूंचे स्वीय सहायक
4. कुलसचिवांचे स्वीय सहायक